IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 5.731
Volume 2, Issue 7, January 2022

# चवदार तळे सत्याग्रह

**सौ. योजना यो. हळदे**

एम. एम. जगताप कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय महाड. रायगड

**सारांश:**

चवदार तळे महाराष्ट्राच्या रायगड जिल्हयातील महाड शहरात असलेला एक ऐतिहासिक तलाव आहे येथील चवदार तळ्याचा सत्याग्रह इतिहासात प्रसिद्ध आहे या सत्याग्रहाला महाडच्या सत्याग्रह या नावानेही ओळखले जाते तळ्याचे पाणी सर्वांसाठी खुले व्हावे व अस्पृश्यांनाही या पाण्याचा वापर करता यावा यासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी येथे सत्याग्रह केला.

**प्रस्तावना:**

महाड सत्याग्रह हा 20 मार्च 1927 रोजी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी रायगड जिल्हयातील महाड येथील सार्वजनिक चवदार तळ्याचे पाणी अस्पृश्यांना घेता यावे म्हणून केलेला सत्याग्रह होता. त्यामुळेच 20 मार्च हा दिवस "सामाजिक संबलीकरण दिन " म्हणून भारतात साजरा केला जातो ही आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली लोकांनी मोठ्या संख्येने एकत्र येऊन केलेली पहिली सामाजिक कृती होती . या सत्याग्रहास महाडचा सत्याग्रह चवदार तळ्याचा सत्याग्रह महाडचा मुक्तिसंग्राम किंवा महाडची सामाजिक क्रांती म्हणून ओळखले जाते.

भारतीय जातीव्यवस्थेमुळे अस्पृश्यांना उच्च जातीय हिंदूपासून वेगळे ठेवण्यात आले होते अस्पृश्यांना पाण्याच्या मुख्य स्त्रोतामधून पाणी घेण्यास तसेच मुख्य रस्त्यावरून चालण्यास परवानगी नव्हती . ऑगस्ट 1923 मध्ये मुंबई कायदेमंडळाने एक निर्णय पारित केला त्यानुसार सरकारी खर्चाने बांधलेल्या आणि सुस्थितीत ठेवलेल्या सर्व मालमत्तेवर सर्वांनी म्हणजेच अश्रुषा नाही वहिवाटीचा हक्क असेल . महाडच्या नगरपालिकेत ने ही जानेवारी 1924 साली या कायद्याची अंमलबजावणी करणारा निर्णय पारित केला परंतु त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी झालीच नाही.

**सत्याग्रह :**

सुरेंद्रनाथ टिपणीस गंगाधर निळकंठ सहस्त्रबुद्धे व अनंत विनायक चित्रे यांच्यासह अन्य पुरोगामी सामाजिक कार्यकांतकर्त्यांसह डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे संयोगी महाड सत्याग्रह दरम्यान डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना मदत करण्याचे काम ते करीत होते.

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 5.731
Volume 2, Issue 7, January 2022

कोकणातील महाड हे शहर सत्याग्रहासाठी निवडले गेले कारण उच्च जातीय हिंदूंनी हे धोरण प्रत्यक्षात आणण्यासाठी तयारी दाखवली होती त्यामध्ये अनंत विनायक चित्रे गंगाधर निळकंठ सहस्त्रबुद्धे ,सुरेंद्रनाथ टिपणीस हे महाड नगरपालिकेचे प्रमुख ही त्यात सहभागी होते त्यांच्यासह अन्य पुरोगामी सामाजिक कार्यकर्ते व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संयोगी महाड सत्याग्रह दरम्यान डॉ.आंबेडकरांना मदत करण्याचे काम करीत होते 1927 साली सुरेंद्रनाथ टिपणीस यांनी नगरपालिकेचे प्रमुख म्हणून सर्व सरकारी संपत्ती सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांसाठी खुली केली आणि त्यानिमित्ताने आंबेडकरांना सहभाग घेण्यासाठी आमंत्रण दिले सभेनंतर सर्वजण चवदार तळ्याकडे गेले आंबेडकरांनी सर्वात प्रथम त्या तळ्यातून पाणी पिले आणि त्यानंतर जमलेल्या सर्व लोकांनीही त्या तळ्याचे पाणी प्यायले .त्यावेळी स्त्री- पुरुष मिळून सुमारे पाच हजार जण त्या सभेसाठी आणि नंतर चवदार तळ्याचे पाणी पिण्यासाठी आलेले होते त्यातील पुरुष हे आपल्या हातात काठी घेऊन आलेले होते हात काठी घेतलेले पुरुष म्हणजे महारजातीचे पुरुषांचे चिन्ह होते.

सत्याग्रहींवर सनातन्यांचे अत्याचार

जरी महाड नगरपालिकेने सरकारी अखत्यारीतीतील सर्व पानवटे अस्पृश्यांना खुले केले असले तरी त्या पाण्यावर तसा कसलाही उल्लेख केला गेलेला नव्हता त्यामुळे एवढ्या मोठ्या संख्येने अस्पृश्य जमा होऊन हे त्यांनी आसपासच्या कोणत्याही पानवट्यावरून पिण्यासाठी पाणी घेण्याची हिंमत केली नाही म्हणूनच या सभेसाठी म्हणून आलेल्या लोकांच्या पाण्याच्या सोयीसाठी चाळीस रुपये किमतीचे पाणी उच्च जातीय हिंदू कडून विकत घेण्यात आले होते कारण सभेच्या ठिकाणी अस्पृश्यांना आसपासच्या पानवट्यावरून पाणी घेण्यास मनाई होती.

चवदार तळ्याचे पाणी पिऊन आंबेडकर ते सभेपुरते राहत असलेल्या सरकारी बंगल्यावर परतले आणि इतर सर्व लोकसभेच्या मंडपात परत गेले 14 तळ्यावरून सर्वजण निघाल्यानंतर सुमारे दोन तासाच्या आतच महाड गावात एक अप्पा उठली की तळ्यातील पाणी पाठवल्यानंतर आता जमलेला जमाव वीरेश्वराच्या मंदिरात जाऊन मंदिर ही बाटवणार आहे धर्म धोक्यात आल्याचे उच्च जातीय हिंदूंनी महाड गावभर पसरवले त्यातून उच्च जातीय हिंदूचा एक घोळका हत्यारे लाट्या काट्या घेऊन सभेच्या ठिकाणी आला आणि त्यांनी सभेनंतर गावाकडे जाण्यापूर्वी जेवण करत असणाऱ्या अस्पृश्यांना मारहाण केली हा उच्च जातीयांचा यांचा घोळका नंतर महाड शहरभर फिरवून सर्व अस्पृश्यांना धडा शिकवण्याबद्दल संदेश पोहोचवला गेला . अनेक अस्पृश्यांना स्वतःच्या गावी पोहोचल्यानंतरही हिंसेला सामोरे जावे लागले .

**सध्यास्थिती :**

चवदार तळ्याचा सत्याग्रह इतिहासात प्रसिद्ध आहे या सत्याग्रहाला मार्च सत्याग्रह या नावाने ही ओळखले जाते तळ्याचे पाणी सर्वांसाठी खुले व्हावे वस पुरुषांनाही या पाण्याचा वापर करता यावा यासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी येथे सत्याग्रह केला या लढ्याची आठवण तसेच समतेचे प्रतीक म्हणून पर्यटक या तळाला भेट देतात या परिसरात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या पूर्ण कृतीपुत्र ही उभारण्यात आला आहे.

चवदार तळ्याच्या आसपास अस्पृश्य जातीच्या लोकांना वावरता येत नव्हतं अशा ठिकाणी आज आपणास पाहायला मिळत आहे की तिथे वेगवेगळ्या पंथाचे ,वंशाचे, वर्णाचे ,जातीचे, धर्माचे ,लोक बसण्यास चवदार तळ्यावर सुख समाधान शांतता मिळते म्हणून येत आहेत तसेच वेगवेगळ्या ठिकाणाहून पर्यटक भेट देत आहेत.

**संदर्भ सुची :**

१) अस्पृश्य मूळचे कोण ?ते अस्पृश्य कसे झाले.
२) महाड मधील लोक चळवळी -प्रभाकर भुस्कुटे.
३) महाडचा मुक्तिसंग्राम आणि नानासाहेब टिपणीस
४) दैनिक प्रभात - w.w.w.dainikprabhat.com
५) https://Mr.m.wikipedia.org